म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय दा.वा.
दा.क्र. ९२६२



# नरसी मेहता

BVEK-0401262

# नरसी मेहता

लेखिका

सौ. कमला वाबळे

बा. क्र. 9282 क्र 20/5/57
विषय बा. वा.

किंमत ८० पैसे

BVBK-0401262

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे २

प्रकाशक :
अ. ज. प्रभू
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,
१३२० शुक्रवार पेठ, बाजीराव रस्ता
पुणे २

□ □

© विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

□ □

आवृत्ती १९६८

□ □

मुद्रक :
कृ. वि. बोंद्रे
जनवाणी प्रिंटिंग प्रेस,
४५ बुधवार पेठ, पुणे २

म. प्रं. मं.
क्रा. क्र. 9262 20।5।7
विषय



नरसी मेहता

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | हा कोण ? | ३ |
| २ | उजेडात अंधार | ६ |
| ३ | दुसऱ्यासाठी संसार | ९ |
| ४ | चिक्कूची उदारता | ११ |
| ५ | अनोळखी हुंडी | १४ |
| ६ | मित्र–प्रेम | १६ |
| ७ | विष–पचलं | १८ |
| ८ | भेद संपला | २० |
| ९ | लेकीच्या घरी | २१ |
| १० | मोलाचा दागिना | २५ |
| ११ | खलाचा सल्ला | २६ |
| १२ | श्राद्ध झालं | २९ |
| १३ | अविश्वासू डोळे | ३१ |
| १४ | पत्रिका जमली | ३३ |
| १५ | अगांतुक पाहुणे | ३६ |
| १६ | पाहुण्यांचा शोध | ३९ |


□ □ □

# १ : : हा कोण ?

रात्रीची शान्त वेळ. देह विसाव्यासाठी अंथरुणावर टाकलेला. दिवसभर काय झाले, काय केले, याचा मनात विचार चाललेला. शान्त नि स्तब्ध वातावरण. कुठून तरी पारिजातकाचा मंद सुवास येत होता. मन प्रसन्न होते. इतक्यात एकतारीवर कुणी तरी गात असल्याचा मधुर आवाज आला. स्पष्ट शब्द. गोड आवाज. भावनेची तळमळ. आपल्या मनोमय परमेश्वराशी तादात्म्य पावलेला लीन आवाज वाऱ्याच्या लहरीतून सगळीकडे पसरत होता. सारे विचार थांबले. मनाने गाण्याच्या शब्दांकडे आणि देहाने ध्वनी आणणाऱ्या दिशेच्या खिडकीकडे धाव घेतली. स्वर येत होते. दिसत मात्र कुणीच नव्हते.

" वैष्णव जन तो तेने कहिये, जे पीड पराई जाणे रे ।
पर दुःखे उपकार करे तोये, मन अभिमान न आणे रे ।। १ ।।

सकळ लोकमां सहुने वंदे, निंदा न करे केनी रे ।
वाच काछ मन निश्चल राखे, धन धन जननी तेनी रे ।। २ ।।

समदृष्टीने तृष्णा त्यागी, परस्त्री जेने मात रे ।
जिव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झाले हाथ रे ।। ३ ।।

मोह माया व्यापे नहि जेने दृढ वैराग्य जेने मनमां रे ।
राम नाम शूं ताळी लागी सकळ तीरथ तेना तनमारे ।। ४ ।।

वण लोभी ने कपट रहित छे काम क्रोध निवार्या रे ।
भणे ' नरसैयों तेनुं दरशन करतां कूळ एकोतेर तार्या रे ' ।। ५ ।।

अहाहा ! काय होते त्या गीतात? शब्दाशब्दांतून केलेला उपदेश देहाच्या रोमरोमातून मनाचा वेध घेत होता. बा मना, दुसऱ्याला

होणाऱ्या दुःखानेही तुला वाईट वाटायला हवं! जनसमुदायात असलास तरी कुणाची निंदा करू नको. खोटं बोलून वाचेला विटाळू नकोस. अरे, कुणाच्या धनाला स्पर्शूही नकोस. अरे, त्या सर्वेश्वराच्या नावात तल्लीन हो. त्याला शरण जा. तो तुला तारील. तुझे कुल उजळेल. दीनदुबळ्यांची सेवा कर परमेश्वर तुझ्यापाशी आहे.

आपल्या महात्माजींचे हे आवडते गीत. त्यांनीही हाच संदेश आमरण सर्वांना दिला. दीन दुबळ्यांची सेवा केली. अखंड नामस्मरण केलं. कोण विसरेल हे?

कुणाचं हे गीत? महात्माजींनाही मोहित करून टाकणारं हे गीत कुणाचं असेल? कोण याचा जन्मदाता? अखंड सेवामार्गानं जाणारा कोण हा संत? त्याचं नाव भक्त शिरोमणी नरसी मेहता. देहाचं चंदन झिजवीत जगाला सन्मार्ग दाखवणारा हा संत नरसी मेहता – सुवासाच्या लहरीत वाऱ्याच्या कणाकणातून हे नाव लोकांच्या मनाला जीवन देत होते. कुठला होता हा संत?

## २ : : उजेडात अंधार!

गुजराथ हा संपन्न देश. अन्नधान्याची विपुलता. सुखी जीवनाला पुरेशी धनदौलत. सहज पिकणाऱ्या काळ्याभोर जमिनी, साधं जीवन, सरळ माणसं.

अशा या गुजराथेतील जुनागड नावाचे गाव. त्याच्याही जवळच एक छोटेसे गाव, या गावात नरसींचा जन्म झाला. मे १४१५ साल होते ते. मध्यम स्थितीतले कुटुंब. त्यांना एक वडील भाऊ

होते. पण आई आणि वडील यांचे सुख मात्र त्यांना मिळाले नाही. ते दीड-दोन वर्षांचे असतानाच त्यांचे वडील वारले. आईही पुढे फार दिवस जगली नाही. कुटुंबाचा भार नरसींच्या वडील भावावर पडला. त्या काळच्या चालीरीतीप्रमाणे त्यांच्या वडील भावाचे लग्न लौकरच झालेले होते. ती एवढीशी मुलगी आता सारं पाही. भावाला नोकरी होती. भावाभावांचे फार प्रेम होते. नरसी हुशार होते; म्हणून त्यांच्या भावानं त्यांना शाळेत घातले. गुरुजीही चांगले मिळाले. ते नरसीला गुजराथी शिकवीत, संस्कृत शिकवीत. संस्कृत तर नरसी अगदी तन्मयतेनं शिकत. परंतु या सगळ्या गोष्टींपेक्षा नरसीला देवाचे भजन आवडे. त्यांच्या शाळेजवळ एक कृष्णमंदीर होतं. तिथे नेहमी भजन कीर्तन चाले. शाळा सुटली की नरसी त्या मंदिरात जाऊन बसत, भजन, कीर्तन ऐकत आणि अत्यंत मनोहर असलेल्या त्या कृष्ण-मूर्तीकडे ते तासन तास पहात राहात. कधी कधी घरी यायचा सुद्धा त्यांना विसर पडे. तिथल्या वातावरणाचा त्यांच्यावर खूप परिणाम झाला. नरसीला भजन-कीर्तन फार आवडू लागले. सापडल्या वेळात कुणा गरीब दुबळ्याची सेवा करावी. कुणाचं दुखलं खुपलं बघावं. कुणाच्याही अडचणीला उपयोगी पडावं, असं त्याला वाटे. तो खेळला तरीही प्रामाणिकपणे खेळे. उरल्या वेळात नामाचा जपही करी. कीर्तनकाराने सांगितलेल्या गोष्टी तो लक्षपूर्वक ऐके. त्यामुळे घरचं वातावरण मात्र निराळे होई. भावाभावांचे प्रेम. पण भावजय परक्या घरची पोर. ती नरसीचा राग राग करी. तिला वाटे, घरकामातही याने मदत करावी. पण नरसीला वेळच सापडत नसे. पूर्वी महारचांभारांना विहिरींना शिवू देत नसत. त्यांना पाणी शेंदून घालायला नरसी जाई. त्यांना हवे नको आणून द्यावं. कुणी आजारी असलं तर चौकशी करून औषधपाणी आणून द्यावं. या असल्या कामात त्याचा वेळ जाई अभ्यासही मन लावून करी. मग घरकामाला फुरसत कुठली?

आणि त्यांतून वहिनीनं सांगितलेलं काम विसरून जाई. बाहेरच्या लोकांच्या उपयोगी पडतो, आपलं मात्र ऐकत नाही म्हणून ती आणखी चिडे.

कधीमधी वहिनीने दिलेला खाऊ हा गरीब मुलांना देई आणि आपण उपाशी राही. वहिनीला हे कळे, तेव्हा ती खूप रागावे.

एक दिवस काय झाले, जेवणाची वेळ टळून गेली होती. नरसीचा घरी पत्ता नव्हता. बारा वाजून गेले. वहिनी किती वाट पाहणार ! तिने जेवून घेतले व त्याचे ताट वाढून ठेवले.

दार वाजले. रखरखत्या उन्हातून नरसी एका भिकाऱ्याच्या मुलाला घेऊन आला होता. तो भिकारी पोरगा तहानेनं अगदी व्याकूळ झालेला होता. त्याला कुठंच पाणी मिळालं नव्हतं. नरसीने त्याला पाहिले आणि त्याचं मन कळवळले. आपल्या घरून थोडंसं अन्न आणि पाणी त्याला द्यावं म्हणून नरसीने त्याला घरी आणले. वहिनीला त्यानं सारं सांगितलं. "थोडीशी भाकरी दे ना !" तो वहिनीला म्हणाला; पण वहिनी आज फारच रागात होती. ती काहीच बोलेना. त्या पोराला खायला आणि पाणी दिल्याशिवाय मी जेवणार नाही असा नरसीने हट्ट धरला.

संतापलेल्या वहिनीनं त्या भिकाऱ्याला हाकून दिलं. नरसीला खूप वाईट वाटलं. तो खाली मान घालून उभा राहिला. वहिनी बोलत होती, "फुकटचं गिळता आणि भिकारी टोकारी कशाला गोळा करता? भाऊ चोवीस तास कष्ट करतो, त्याला मदत करणं तर नाहीच. अन वर हे चाळे! नुसतं वेळेवर येऊन गिळवतसुद्धा नाही. काही लाज तरी वाटते का तुमच्या मनाला !" एक की दोन हजार शब्द ती बोलत होती.

नरसीच्या डोळ्यांतून अश्रू वहात होते. एक शब्दही न बोलता तो वहिनीचा राग सहन करीत होता. पण आज त्याला ते सहन होईना. तो तसाच न खाता पिता तडक घराच्या बाहेर पडला. पण कुठं जाणार ! वाट फुटेल तिकडे तो चालत होता. त्या लखख प्रकाशातही नरसीच्या मनात अंधार होता. त्याला कोणीही थांबवले नाही. कोण थांबविणार ? कुठे गेला असेल नरसी.

## ३ : : दुसऱ्यांसाठी संसार

संध्याकाळ झाली. भाऊ घरी आला. त्याला नरसी कुठेच दिसेना. त्याने बायकोजवळ चौकशी केली. वहिनीचा राग अजून उतरला नव्हता तिने रागातच नरसी निघून गेल्याचे सांगितले.

" निघून गेला ! कुठं ? " भावाला आश्चर्य वाटले.

" मला काही सांगून गेले नाहीत."

भावाला फार वाईट वाटलं. त्याचे नरसीवर फार प्रेम होते. बायकोचा स्वभावही माहीत होता. तिच्यावर रागवून काहीच उपयोग नव्हता.

तो तसाच तडक गावात गेला. जेथे जेथे शक्य होतं तिथं तिथं नरसीला शोधले. अगदी महारवाड्यात, चांभारवाड्यात सुद्धा

तो जाऊन आला. नरसी कुठंच सापडेना. रात्र झाली. अंधार पडला. भाऊ घरी पसरला. नरसी आला नव्हता.

आता त्याने ही गोष्ट चार माणसांच्या कानावर घातली. चौफेर शोध सुरू केला. शक्य तेथे माणसेही धाडली. पण शोध लागेना. त्याला फार दुःख झाले. पण काय करणार ?

दिवसामागून दिवस गेले आणि एक दिवस अचानक नरसी आला. त्याच्या आवडत्या कृष्णमंदिरात नरसी भजन गात होता. देवळात माणसे होती, मुले होती, त्यांनी नरसीला ताबडतोब ओळखलं. "नरसीकाका, नरसीकाका," म्हणून मुले त्याच्या भोवती नाचू लागली. नरसीलाही खूप आनंद झाला. मुलांच्या घोळक्यात नरसीही नाचू लागला. मुलांना भजन शिकवू लागला. मुलं गाऊ लागली, भक्ती आणि प्रेम यांचे मीलन झाले. प्रेमपूर्ण दृष्टीनं नरसी साऱ्यांकडे पहात होता. लोक जात होते, येत होते.

भावाच्या घरीही कळलं. नरसी देवळात आलाय. भाऊ धावतच निघाला. दोघांची भेट झाली. भावानं नरसीला घट्ट मिठी मारली. त्याच्या डोळ्यांत अश्रू होते. त्याने नरसीची क्षमा मागितली आणि त्याला आग्रहपूर्वक घरी घेऊन गेला. नरसीचा कुणावर राग नव्हता. तो रागालो भापलीकडे गेला होता. भावासाठी तो घरी आला. वहिनीलाही त्याने वंदन केले.

परंतु तो आता पहिल्यासारखा राहिला नव्हता, त्याचं मन आता कुठंच लागत नव्हतं. ईश्वरचिंतन व भजन यातच तो रंगलेला असे. त्याचा सारा वेळ कृष्णमंदिरात जाई. जात नाही, धर्म नाही, नरसी साऱ्यांनाच भजन करायला सांगे आणि आपणही भजनात दंग असे. भजन, पूजन हेच त्याचं जीवन होतं. भावाला काय करावे, ते कळेना. नरसीचं मन पुन्हा घरात कसे रमेल, याची त्याला चिंता लागली

होती. कुणी म्हणत, "अरे! नरसीचे लग्न करून टाक म्हणजे ठीक होईल. हाच एक उपाय – त्याला घरात लक्ष द्यायला लावील."

पण मुलगी कोण देणार! नरसी भावावरच अवलंबून. तो बायकोचं पोट कसे भरील? असे लोकांना वाटे.

भावाची स्थिती बरी होती; पण त्याला अजून मूलबाळ नव्हते. नरसीवर त्याची मायाही फार होती.

असाच विचार करून एक गरीब ब्राह्मण आपली मुलगी नरसीला द्यायला तयार झाला. मुलगी सुस्वरूप होती; गरीब होती. पण बापाजवळ पैसा नव्हता. म्हणून ती अद्याप उजळली नव्हती. घराणं कुलशील सारं चांगलं होतं, म्हणून नरसीच्या भावानं हे लग्न ठरवलं. भावाचं मन मोडायला नको, या एकाच भावनेने नरसी लग्नाला उभा राहिला आणि लग्न समारंभ पार पडला.

परंतु नरसीच्या वृत्तीत काही फरक पडला नाही. नरसींना दोन कन्या आणि एक पुत्रही झाला. दिवसभर घरात कष्ट करून त्यांची पत्नी संसाराचा भार वाही. समाधान हाच एक दागिना नरसीच्या बायकोच्या अंगावर असे. सारं सुरळीत चाललं होतं पण......

## ४ : : चिक्कूची उदारता

नरसीच्या वहिनीला आता हे सहन होत नव्हतं. आपल्याला मूलबाळ नाही. नवऱ्याचा सारा पैसा दिराच्या मुलांसाठी खर्च होतो. काही न मिळवता याचा संसार फुलतो आहे. तिला मत्सरानं ग्रासलं

आणि एक दिवस तिनं दिराला घराबाहेर व्हायला सांगितलं. नोकरी नको, चाकरी नको, आयतं खाता. पण आता हे जमणार नाही. नरसीची पत्नी सारं ऐकत होती, तिला खूप वाईट वाटलं. अहोरात्र कष्ट करून ती जावेला सुखविण्याचा प्रयत्न करीत होती. पण नरसीचा फुलता संसार हेच जावेचं दुःख होतं. ते कसं संपणार ! नरसीची भावजय सदैव काहीना काही भांडण काढीत असे. आजचा दिवस असाच होता आणि तिनं नरसीला घराबाहेर जायला सांगितलं. भाऊ घरी नव्हता. भावाला वंदन करून जायचं नरसीने ठरवलं, पण जायचं कुठं? त्यांच्या पत्नीला चिंता पडली. नरसी म्हणाले, "देव नेईल तिकडे जायचं. साऱ्या धर्मशाळा, सारी देवळं आपलीच नाहीत का?" ती गप्प बसली. "कशाला चिंता वाहतेस. परमेश्वराला माझी काळजी आहे. तो सारं निवारील." असं सांगून तो शान्त मनानं भजन करीत राहिला.

भावाला घरी आल्यावर सारं कळलं पण तो काहीच बोलला नाही. नरसीने त्याला वंदन केलं आणि सारीजणं धर्मशाळेत गेली. आपलं कसं होणार या चिंतेनं नरसीच्या पत्नीच्या डोळ्यांचं पाणी खळत नव्हतं, तिच्या वडिलांना कळलं पण एकादशीकडे शिवरात्र. ते अधिक काय करणार ! थोडासा शिधा – भांडीकुंडी त्यांनी लेकीला दिली. त्यांच्या संसाराचा सारा भार तो कसा उचलणार ! आणि नरसीच्या पत्नीलाही ते रुचलं नसतं. दोन दिवस गेले, चार गेले, आठ गेले. कुटुंबाचे हाल होत होते. ती पतिपरायण साध्वी नवऱ्याला एका अक्षरानेही बोलत नव्हती. देवावर आणि दैवावर भार टाकून सुचेल तसे ती वागत होती.

गावातच एक श्रीमंत माणूस होता. तो नित्य देवदर्शनाला येई. त्याला नरसीचं हे कुटुंब तिथं रोज दिसे. त्यानं चौकशी केली. परस्परच त्याला कळलं, नरसीला भावानं बाहेर काढलं आहे. याचे त्याला वाईट वाटले. त्यानं विचार केला. केवढं मोठं आपलं घर. ना मूल ना बाळ. बायकोलाही या मंडळींची सोबत होईल आणि आपला पैसाही सत्कारणी लागेल. त्यानं पत्नीला बरोबर आणलं. उभयतांनी नरसीला विनंती केली, "आपण धर्मशाळेत राहू नये. आमच्या वाड्यात बिऱ्हाड मांडावं. आम्हांला आपल्या येण्यानं फार आनंद होईल." नरसीने पत्नीवर सारं सोपवलं. तिला तर वाटलं. या दोघांच्या रूपानं परमेश्वरच आपल्याला न्यायला आला. त्यांनी बिऱ्हाड हलवलं. श्रीमंत पतिपत्नीलाही आनंद झाला. आयुष्यात आपल्या हातून सज्जनांची सेवा घडावी, एवढेच त्यांना वाटत होते.

गावात सगळीकडे समजलं. जो तो आश्चर्य करू लागला. हे घडलं कसं! तो श्रीमंत माणूस चिक्कू म्हणून प्रसिद्ध होता. नरसीचं अक्षर सुंदर म्हणून हिशोब लिहिण्यासाठी मी त्याला नोकरी दिली असे तो साऱ्यांना सांगे.

नरसीच्या भजन-कीर्तनात, नामस्मरणात कशातच खंड नव्हता. गावातल्या काही लोकांना त्याचे हे वागणे आता ढोंग वाटू लागले. भावाचं घर सुटलं. आता लागला की नाही उद्योग करायला!

काही तरी करून याचं हे ढोंगही आता उघडं केलं पाहिजे. जे टवाळ होते ते एकत्र बसून त्याची टवाळी करीत.

कोणी भले म्हणत, या चिक्कू माणसाला चांगली बुद्धी देऊन देवानंच त्याची पाठ राखली. भोळा नरसी. त्याची काळजी देवाला असली पाहिजे.

नरसींचं सारं सुरळीत चाललं होतं. 'तो श्रीमंत माणूस' नाममात्र काम देऊन नरसींचा योगक्षेम चालवीत असे. नरसींची पत्नी सालस–कष्टाळू होतीच. तिने तर सर्वांचेच मन राखले होते. पण नेमके हेच गावातल्या टवाळ कंपूला सहन होत नव्हते. काहीतरी करून नरसीची फजिती झाली पाहिजे, असं त्यांना वाटे.

त्यांना हवी होती, तशी एक संधी चालून आली. गावात साधूंचा एक मेळा आला होता. त्या मंडळींना द्वारकेला जायचं होतं, पण त्यांना असं कळलं की, वाटेत चोराचिलटांचा फार फार उपद्रव आहे. रोख रक्कम बरोबर घेणे, योग्य होणार नाही. हुंडी देणाऱ्या एखाद्या सावकाराच्या शोधार्थ ते तेथे आले होते. या टवाळ लोकांची आणि त्यांची गाठ पडली. त्यांनी सभ्यपणे 'आम्ही आपल्याला उत्तम सावकार पाहून देतो. काही काळजी करू नये' असे सांगितले. मग त्यांनी एकमेकांत नरसीचे नाव सुचवायचे असे ठरवले. "प्रथम आम्ही सांगतो ते ऐकून घ्या आणि मग सावकाराकडे जा. आमच्या गावात नरसी नावाचा एक सावकार राहतो. पण तुम्ही जेव्हा त्याच्याकडे जाल तेव्हा तो सांगेल 'मी गरीब माणूस, हुंडी कशी देणार? मला कोण ओळखणार? कृपा करून आपण दुसऱ्या सावकाराकडे जावे' आणि गेल्याबरोबर तो तुम्हांला दरिद्रीही वाटेल; पण हे खरे नाही. त्याच्या इतका उत्तम सावकार सबंध जुनागडमध्ये तुम्हांला मिळणार नाही. जेव्हा आपण हट्ट धरून त्याच्याजवळून हुंडी घ्यावी."

उत्तम सावकार मिळणार या कल्पनेने साधूंना बरे वाटले.

आम्हांला त्या सावकाराचे घर आपण दाखवावे, अशी मंडळींना साधूंनी विनंती केली.

एक दोघांनी लांबूनच नरसीचं घर दाखवलं. साधूजन पाहताच नरसी नम्रपणे बाहेर आला. नमस्कार चमत्कार झाले. आपल्याला माझ्याकडून काय मदत हवी? नरसीला पाहूनच साधूंना आनंद झाला. त्यांनी नम्रपणे, "आम्ही द्वारकेला जात आहोत" असे सांगून हुंडी देण्याबद्दल विनंती केली. "वाटेत चोरांचा उपद्रव आहे, असे ऐकतो. तेव्हा हे सातशे रुपये घेऊन आम्हांला हुंडी देण्याची कृपा करावी."

नरसीला आश्चर्य वाटलं. "मी गरीब माणूस. मला द्वारकेत कोण ओळखणार? आपला काही तरी गैरसमज झालेला दिसतोय. मी सावकार नाही. तर हुंडी कुणाला देऊ? दुसरी काही सेवा असल्यास सांगावी."

साधूंना नरसी असं म्हणेल हे आधीच ठाऊक होतं. त्यांनी नरसीचे पाय धरले आपण कसंही करून हुंडी द्यावी अशी त्यांनी नरसींची विनवणी चालविली. आपण हुंडी न दिली तर द्वारकाधीशाचं दर्शन आम्हांला घडणार नाही. कदाचित वाटेतच मरावं लागेल. देवदर्शन घडविल्याचं पुण्य आपण पदरी घ्यावं आणि हुंडी द्यावी. आम्हांला ठाऊक आहे. गावातले सर्वांत उत्तम सावकार आपणच आहां. असे म्हणून त्यांनी सातशे रुपयांची थैली नरसींच्या पायाशी ठेवली.

नरसींना समजून आलं. गावात कुणी तरी हा उद्योग केला आहे. त्यांना वाईट वाटले. ठीक आहे. आपली मर्जी आहे तर हुंडी देतो, असं म्हणून त्यांनी हुंडी लिहिली आणि 'हरीची इच्छा!' एवढेच उद्गार काढून हुंडी त्यांच्या हवाली केली आणि द्वारकेच्या

भरपेठेत शामळशहा राहातो त्याला ही चिठी द्यावी, एवढेच सांगितले. साधूंना आनंद झाला. गूळ पाणी घेऊन ते मार्गस्थ झाले.

नरसीने गावात ब्राह्मणांना बोलावणे धाडले आणि सातशे रुपयांची थैली त्यांच्यापुढे ओतली. सारे पैसे वाटून टाकले.

सर्वांनाच नवल वाटले. काय हा वेडेपणा ! टवाळ लोकांनाही मोठं चमत्कारिक वाटलं. वेडा तर नाही नरसी ! काही का असेना, आज ना उद्या साधू पैसे मागायला येतीलच ! हुंडी देतोय ! कोण विचारणार याला ! साधूंचा मार मिळाला नाही म्हणजे झालं.

आपल्या योजनेचं कौतुक करीत सारे घरोघर परतले.

## ६ : : मित्र–प्रेम

योग्य वेळी साधूंचा मेळावा द्वारकेला पोहोचला. आता त्यांना पैशांची गरज होतीच. ते द्वारकेच्या भरपेठेत शामळशाह सावकाराची चौकशी करू लागले. परंतु त्यांना या नावाचा सावकार किंवा त्याची पेढी दोन्हींचाही शोध लागेना. ते लोकांजवळ अधिकाधिक चौकशी करू लागले. पण कोणालाच हे नाव माहीत नव्हतं. लोक त्यांना म्हणत, ‘ अहो, या नावाचा सावकार किंवा त्याची पेढी संबंध द्वारकेत फिरलात तरी सापडणार नाही बरं. साधूंना नवल वाटले. ते म्हणत ‘ जुनागडच्या नरसी सावकारानं ही हुंडी दिली आहे. खोटी कशी असेल ती ! ’

सारे पहात पुढे जात.

'लोकहो, आम्ही परस्थ माणसं. आपण आमचा अंत पाहू नये. या सावकाराचा आम्हाला तपास लावून द्या. आमच्यावर फार उपकार होतील आपले ! पैशावाचून आम्ही येथे काय करणार !'

आता लोकही त्यांना हसू लागले. आणि लबाडही म्हणू लागले. कुठला कोण नरसी सावकार ? आजपर्यंत आम्ही त्याचं नावही कधी ऐकलं नाही.

एकूण परिस्थिती लक्षात येऊन साधू हताश झाले. आपण फसलो, असंच त्यांना वाटायला लागलं. गावाबाहेर एका मोठ्या वृक्षाखाली ते बसून राहिले. देवदर्शनही नाही आणि पैसेही नाहीत. नरसींची सोज्वळ मूर्ती त्यांना लबाड वाटू लागली.

इतक्यात एक शेटजी लगबगीने त्यांच्याचकडे येताना त्यांना दिसले. आशेला अंकूर फुटले. शामळशहा तर नसेल हा ! शेठजी तेथपर्यंत पोहोचले आणि त्यांनी मंडळींना नमस्कार केला; कुशल विचारले.

"आपण जुनागडहून आलात काय ?" शेठजींनी विचारले. साधूंनी तात्काळ हो म्हटले.

"नरसी सावकाराने आपल्यालाच हुंडी दिली ना ? तेवढी द्यावी." साधूंनी लगेच हुंडी पुढे केली. "आपणच शामळशाह काय ?" "होय." त्यांनी हुंडी देऊन पैसे दिले आणि त्यांची क्षमा मागितली. "आपल्याला खूप त्रास झाला असं कळलं. पण शामळशहा हे माझे बाळपणचे नाव. ते येथे कोणालाच माहीत नाही. म्हणून आपल्याला चटकन माझा शोध लागला नाही. नरसी माझा बालमित्र आहे. त्याने खुणेसाठीच हे नाव लिहिले असावे. माझ्या पेढीवरही आपल्याला कोणी ओळखलं नसेल. केवळ नावानं घोटाळा झाला. तसदीची माफी करावी."

एवढे बोलून शेठजी आले तसे निघूनही गेले. शेठजींच्या रूपात परमेश्वरच भेटला, असे साधूंना वाटले. आपल्याला शोधीत तो येथपर्यंत आला. खरोखरच भला माणूस! आपण उगीच नरसीला शिव्या दिल्या. असो! झाले ते झाले.

गावात जाऊन त्यांनी देवदर्शन घेतले. दानधर्म, पूजाअर्चा सर्व व्यवस्थित झाले. शामळशाहच्या मित्र-प्रेमाचं कौतुक करीत चार दिवस त्यांनी द्वारकेत काढले. आता परत गेल्यावर नरसींना भेटायचं, सर्व सांगायचं, असं त्यांनी ठरवलं.

## ७ : : विष-पचलं !

इकडे जुनागडला मंडळी साधूंची वाट पहातच होती. ते केव्हा येतात आणि नरसीचे आणि साधूंचे भांडण केव्हा होते; नरसी पैसे कुठून भरतो. हे सारे बघण्यासाठी कुटाळ कंपू उत्सुक झाला होता.

आणि त्यांच्या घरी अपेक्षेप्रमाणे साधूंचा मेळा जुनागडला आला. लोकांना कुणकूण लागलीच. ते आता नरसीच्या घरच्या आसपास वावरू लागले. भांडणाची वाट पाहू लागले.

नरसीने सर्वांचे स्वागत केले. द्वारकेच्या यात्रेची चौकशी केली. द्वारकाधीश कसा आहे? वर्णन तरी या कानांना ऐकावा. साधूंनी सारे वर्णन करून सांगितले डोळे मिटून नरसी ती मूर्ती हृदयात साठवीत होते. साधू आणखी सांगू लागले, "अहो, प्रथम तुमची हुंडीच पटेना. जो तो म्हणे शामळशाह नावाचा कोणी सावकारच येथे नाही. निराश होऊन आम्ही शेवटी गावाबाहेर जाऊन बसलो.

आणि काय सांगावं. आपला तो बालमित्र आम्हांला शोधीत तेथे आला बरं! त्याच्या माणसांनी पेढीवर आम्हांला ओळखलं नाही म्हणून त्यानेच आमची क्षमा मागितली. आपण त्याचं बाळपणचं नाव चिठ्ठीवर लिहिलंत ते कोणालाच माहीत नव्हतं, म्हणून हा घोटाळा झाला, असंही त्यानं सांगितलं. असा मित्र विरळा!"

नरसीच्या डोळ्यांतून घळघळा पाणी वाहू लागले. तो स्वतःशीच बोलत होता, 'माझा बालमित्र!'

'द्वारकाधीशा! तुला मी कष्ट दिले! तूच तो! तुझ्या वाचून माझे कोण आहे तिथं?' डोळे मिटून गहिंवरल्या आवाजाने ते गाऊ लागले!

> भक्त विठ्ठल को बिडद है, सारेंगे हरि काज।
> छिन छिन निकट नांदान है, दिनबंधु महाराज॥

भजनाचा घोष सुरू झाला. साधूही त्यात रंगून गेले. नरसींना पुन्हा पुन्हा वंदन करून ते मार्गस्थ झाले.

आपलं भाग्य थोर म्हणून असा सावकार आपल्याला भेटला. सावकार कसला संत हा! गावकऱ्यांचे खरोखरीच आभार मानावेत असंही त्यांच्या मनात आलं.

पण गावकरी—

नरसीचं आणि साधूंचे भांडण होणार. नरसीकडे ते पैसे परत मागणार आणि त्याची फजिती होणार. म्हणून ते बाहेर थांबले होते. म्हणे परधन विष आहे. पाहू आता! ते विष कसं ओकतोय ते! निस्पृहपणाचं ढोंग सोपं आहे; पण परिणाम!

पण घडले काय! नरसीला वंदन करून सारे प्रेमाने बाहेर पडले होते. हुंडी पटली होती, पैशाची आणि प्रेमाचीही!

गावकऱ्यांची तोंडे बघण्यासारखी झाली होती!

नरसींची दिनचर्या भजन कीर्तनातच रंगत असे. देवळात ते कीर्तनाला उभे राहिले की गावाबाहेरची अस्पृश्य मंडळीही येऊन दूर उभी रहात. नरसीने सांगितलेली भजनं गात. आपली दुःखेही ते विसरून जात. काही अस्पृश्य मंडळी धीर करून त्यांच्या घरी गेली. त्यांना असं समजलं की, नरसींच्या घरी सर्वांना मुक्तद्वार आहे. त्यांना अत्यंत आनंद झाला. आता ती उघडपणे नरसींच्या घरी भजनाला येऊन बसत.

गावकऱ्यांना हे पटणं शक्यच नव्हतं. त्यातून आपण नागर ब्राह्मण ! केवढा भयंकर भ्रष्टाकार करतो आहे हा नरसी ! पण नरसीला बोलून काहीच उपयोग नव्हता. लोक त्या अस्पृश्यांना हुसकून लावीत. त्यांना मारीत सुद्धा. कुणाला शिक्षा करीत. परंतु त्या मंडळींना आता भजनाची गोडी लागली होती. सारे सहन करूनही ते नरसीदेवाच्या भजनाला येत; पण नरसींनाही हे लोक त्रास देतात, असे कळल्यामुळे बिचाऱ्यांना वाईट वाटे. त्यांची ती धडपड पाहून नरसींनाही वाईट वाटे.

एकदा काही अस्पृश्य मंडळी नरसींना म्हणाली, " महाराज, आम्हांला येथे येता येत नाही. तरी आपण आमच्याकडे महारवाड्यात कीर्तनाला याल का ? आम्हांला फार फार आनंद होईल. "

एका क्षणाचाही विचार न करता नरसींनी ताबडतोब ' होय येतो की ' म्हणून सांगितले. दिवस ठरला. अस्पृश्य मंडळी हर्षित होऊनच घरी परतली.

आज महारवाड्यात केवढा आनंदाचा दिवस ! आज नरसींचं भजन त्यांच्या दारात होणार होतं. मोठ्या चिंचेखालचं पटांगण

सारवून सुरवून साफ केले होते. येतील तशा रांगोळ्या काढल्या होत्या. आंब्याचे टाळे आणून लावले होते. रंगीत कागदांच्या पताका-सुद्धा या झाडापासून त्या झाडापर्यंत बांधल्या. सारं कसं सुशोभित केलं होतं. रात्रीची वेळ म्हणून एक बत्तीसुद्धा झगझगत होती. न्हाऊन माखून नरसीच्या स्वागताला सारे उत्साहानं तयार होते. नामाच्या गजरात नरसींची स्वारी येऊन दाखल झाली. सारी रात्र भजनाचा रंग चालू होता. नामघोषाच्या लहरी साऱ्या गावावर पसरत होत्या. दुःख उरलं नव्हतं. गरीब-श्रीमंत भेद, सोवळा-ओवळा भेद संपला होता. सारे एकत्र नाचत होते. रात्र केव्हा संपली ते कळलं सुद्धा नाही. कोंबडा आरवला. साऱ्यांना जागृती आली.

रात्रीच्या नामघोषाने कुटाळांना सुद्धा आपल्या दुष्टपणाचा घटकाभर विसर पडला होता. लांब उभे राहून साऱ्यांनी तो सोहळा पाहिला होता.

नरसींना जातीबाहेर टाकायचं असं ठरवणारी तोंडं घटकाभर मुकी झाली होती.

धन्य ते नरसी आणि धन्य तो भक्तीचा महिमा !

## ९ : : लेकीच्या घरी

नरसींची मुलगी कुंवरबाई आता मोठी झाली होती. भक्तीच्या रसरंगात वाढलेली ती गोजिरी पोर कुणालाही आवडायची. ती पाण्याला गेली म्हणजे सारी तिच्याकडे बघत. एखाद्या कमलकळीसारखे हळुहळू तिचे रूप उमलत होते

कोणा भाग्यवंताचं घर उभे करणार ही ? घरात लक्ष नसलेला पिता. जोडीला दारिद्र्य. आईला काळजी वाटे. पण पतीवर तिची

श्रद्धा होती. " देव काळजी करील, तू कशाला चिंता वाहतेस ? " असं नरसी म्हणत. त्यावरच ती माऊली स्तब्ध होती

गावात कुणाकडे तरी एक धनिक शेठजी पाहुणे आले होते. त्यांच्या नजरेला कुंवरबाई दिसली. ' कुणाची पोर ? ' त्यांनी चौकशी केली. नरसीची हकीकत त्यांना कळली होती. कसलाही विचार न करता नरसीच्या घरी ते गेले आणि कुंवरबाईला त्यांनी आपल्या मुलासाठी मागणी घातली. नरसीला वाटलं देवानेच यांना धाडले. त्याने ताबड-तोब मागणी मान्य केली.

साखरपुडा झाला. कुंवरबाईला कुंकू लावले. लग्नाची तयारी सुरू झाली. बायका माणसांना हे कळलं. मुलासाठी त्यांनी काय धाडलंय ? शेठजींना बायकोने विचारलं. शेटजी काहीच बोलले नाहीत.

योग्य वेळी लग्न झालं. मुलाकडच्या वऱ्हाडी मंडळींना मुलीच्या घरून कपडे नाहीत, अलंकार नाहीत, निदान मिठाई ? तीदेखील भरपूर मिळाली नाही. दरिद्री बापाची पोर सून म्हणून घरात येणार हेच मुळी बायका मंडळींना पसंत नव्हते. पण पुरुष मंडळींपुढं त्यांचं काही चालले नाही.

परंतु हा राग सासू आणि नणंदा आता बिचाऱ्या कुंवरबाईवर काढत. तिला वाकडे बोलत. कुंवरबाई डोळे पुसी आणि मुकाट्यानं पडलं काम करी.

कधी कधी येणाऱ्याजाणाऱ्यांबरोबर ती आईवडिलांना निरोप धाडी – पण काही उपयोग होत नसे. कधी काही मिठाई सुद्धा तिकडून येत नसे. विचारी पोर ! हिरमुसली होई आणि साऱ्यांची बोलणी निमूटपणे ऐकून घेई.

कालमानानं कुंवरबाईचा ऋतुशांती समारंभ होणार होता. माहेरी बोलावणं धाडावं किंवा नाही ! घरात बोलणी सुरू झाली. कुणी म्हणत रीतीनं बोलावणं करावं, कुणी म्हणत काही नको बोलायला ! सासू तर धुश्र्यातच. ती म्हणे बोलावून काही देणार का आहेत ? ती भिकारडी ! लग्नातच तोंडाला पाने पुसली; तर आता काय ! काही नको आता बोलावणे ! कुंवरबाईचा सासरा सज्जन माणूस; त्याने बोलावणे पाठवले. गड्याबरोबर साखर सुपारी रवाना झाली.

जुनागडला नरसींकडे गडी पोहोचला. आईनं साखरपानं पाहिली. मुलीला काहीतरी पाठवायला हवं असं तिलाही वाटले. पण त्या धनिक माणसांना साजेसं घरात काहीच नव्हते. नुसतं जायचं म्हटलं तरी पन्नास रुपये पुरणार नाहीत. तरीही तिनं नरसीला विनवलं. तुम्ही जा. निदान पोरीला भेटून तरी या. तिला तेवढं बरं वाटेल.

घरात एक शेतकरी नरसीला भेटायला आला होता. तो म्हणाला. “ महाराज, माझी गाडी आहे. चलाच तुम्ही. गरिबाला एवढी सेवा घडू द्या आपली. ”

नरसीला काय वाटले कोण जाणे. त्यांनी जायची तयारी दर्शविली. थोडंफार सामान आणून नरसींच्या पत्नीनं लाडू केले. डबा भरला. निघायची तयारी झाली. नरसींची तयारी ती काय ? वीणा, चिपळ्या अन चंदन; थोडेसे कपडे — संपले. झाली तयारी.

त्या शेतकऱ्यानं मोठ्या भाविकपणे गाडी आणली आणि नरसी निघाले.

नरसींच्या घरी एवढंसं जरी खुट्ट वाजलं तरी ते गावकऱ्यांना कळे. सारखे टपलेले असत ना ते !

आजचीही हकीगत कळली आणि रिकाम्या हातानेच नरसी लेकीकडे गेला हेही कळले. आता एवढ्या मोठ्या ठिकाणी हा असा ज़ाणार ! भली खेटरं मिळतील आता. कोण मान देणार त्याला तिथं ? या कल्पनेने मनातून ते आनंदले होते. मजल दरमजल करीत गाडी लेकीच्या गावाच्या वेशीजवळ आली. नवीन गाडी कुणाची. कुतूहलानं लोकांनी चौकशी केली. शेठजींचे व्याही नरसी आले आहेत असे कळले. कानोकानी शेठजींच्या घरी वार्ता पोहोचली देखील. शेठजींनी वेशीवर गडी पाठवला. नरसी आणि गाडीवान. बाकी गाडी रिकामी. सामान नाही, सुमान नाही. गडी गालातल्या गालात हसला. बायका मंडळीत कळलं. कुंवरबाईचे वडील आले. कुंवरबाई सर्वांची नजर चुकवीतच गाडीपर्यंत जाऊन आली. वडिलांना पाहताच तिला आनंद झाला. गाडीत तिची नजर फिरली. काही नाही. तिला रडू कोसळले. शब्दही न बोलता ती परतली. सासरच्या लोकांची टीका तिला कल्पलेनंही कळून चुकली.

व्याही भेटले. नमस्कार-चमत्कार झाले. कुणी तरी विचारले, कोणची खोली व्याह्यांना ? "परसदारी – गुरांच्या वाड्याजवळ" कुणीतरी सांगितलं. नरसीला तिकडे नेले. नरसीला त्याचे काहीच वाटलं नाही. राजवाडा आणि झोपडी त्यांच्या खाती सारखीच होती. मुखमार्जन, साखरपाणी झाल्यावर एकतारी घेऊन ते भजनात रंगले.

पुढच्या दारी केवढा मंडप पडला होता. आप्तांची ये जा सुरू होती. मिठाईच्या करंड्या येऊन पडत होत्या. नरसींना कशाचीच वार्ता नव्हती.

⚜ ⚜ ⚜

९२६२ दि. २०।५।६९
बा. वा.



दुसरा दिवस उजाडला. सनईवादन सुरू झाले. गरीब, श्रीमंत नातेवाइक जमू लागले. आहेर देणे-घेणं सुरू झाले. सोहळा सुरू झाला. कुणी आप्तांनी विचारलंच, सूनबाईच्या माहेरून कोण आलंय? तर उत्तर द्यायला कोणी राजी नव्हतं. या आनंदातही कुंवरबाईच्या डोळ्यांत आसवं जमत होती.

घुंगरं जोराने वाजवत एक सुंदर सारवट गाडी येऊन उभी राहिली. त्यातून एक नोकर उतरला आणि नरसींची चौकशी करू लागला. पण नरसी गोठ्यात नामस्मरण करीत बसले होते. नोकराला कोणीच काही सांगेना. शेवटी नोकरच म्हणाला, "हे पहा, मुली-साठी अहेर घेऊन मी आलो आहे. जरा उशीर झाला; पण त्यांचा निरोपच उशिरा मिळाला. कुठं आहेत नरसी महाराज. त्यांना बोलावलं तर बरे होईल" आहेराचं नाव निघताच सारेजण एकमेकांकडे टकामका बघू लागले. ताबडतोब नरसींना बोलावणं गेलं. नरसी येई-पर्यंत त्या नोकराने गाडीतून सुंदर सुंदर वस्त्रांच्या घड्या, अलंकाराच्या पेट्या, मिठाईच्या करंड्या कितीतरी वस्तू बाहेर ओळीने मांडून ठेवल्या. तो अहेर पाहून सर्वांचेच डोळे दिपून गेले. त्यात प्रत्येका-साठी काहीतरी होतेच. हळुहळू नरसीजी आले. नोकराने पुढे होऊन सांगितले, "महाराज आपल्या एका मित्राने हे आपल्यासाठी पाठविले आहे; त्याचा स्वीकार व्हावा. नरसी त्याच्याकडे पाहातच राहिले. माझा मित्र, एका द्वारकाधीशाखेरीज मला कोणीही सखासोयरा नाही. त्या नोकराच्या जागी त्यांना शंखचक्रगदाधारी द्वारकाधीश दिसू लागला. त्या नोकरालाच त्यांनी दंडवत घातले. त्या अश्रद्ध

लोकांना परमेश्वर कसा दिसणार ! भक्ताची लाज राखणारा परमेश्वर ते कसा ओळखणार !

त्याने प्रेमाने हाक मारली, “ कुंवरबाई, बेटा तुझ्यावर देवाची केवढी माया ही ! घे, सारे घे ! ” ते शान्त उभे राहिले.

सासूबाईच्या परवानगीने कुंवरबाईने सर्वांना अहेर वाटले. केवढ्या मोलाची होती एकेक वस्तू. कुंवरबाईला गहिंवरून आले. तिने वडिलांच्या पायाला मिठी घातली. “ बाबा, किती दुष्ट आहे हो मी. मी तुम्हांला टाकून बोलले. क्षमा करा. मला तुमची योग्यता समजली नाही. या साऱ्यांचं पैशावरच प्रेम आहे. बाबा, मला यातलं काही नको. एक नामस्मरण हाच मोलाचा दागिना मी तुमच्या-वतीनं धारण करते. ”

साऱ्यांना गहिंवरून आलं. पण नरसींना कसलंच भान नव्हतं. ते आपल्या स्थानी जाऊन भजनात तल्लीन झाले होते.

## ११ : : खलाचा सल्ला

सारंगधर नावाचा गावातला खलपुरुष ! नरसीला अधिकाधिक त्रास देण्यात ह्याचा फार मोठा वाटा असायचा. नरसीचं साधुत्व याला सहन होत नव्हतं. भलेपणा पटत नव्हता. सदैव नरसीला त्रास देण्याची संधी तो शोधी.

एकदा नरसीच्या वडिलांचं श्राद्ध होतं. नरसीचे बंधू त्याला प्रसादाला बोलविण्यासाठी नरसीचेच घरी जात होते. वाटेत सारंग-धरजीची गाठ पडली. “ काय ? कुठं निघाला ? ” नरसीच्या बंधूंना त्यांनी विचारलं. त्यांनी सर्व सत्य सांगितले. त्यावर सारंगधर म्हणतो— “ कायहो, तुमचे नी नरसीचे वडील एक. तो का नाही

एखादेवेळी श्राद्ध करीत ?" "सारंगधरजी त्याची परिस्थिती तर तुम्हांला माहीत आहे. तो काय करणार ?" बंधू म्हणाले, "वा असं कसं ! त्याचा परमेश्वर त्याला करतो ना हवी तेवढी मदत. आणि असं पहा—त्याचा संसार मुलाबाळांचा आहे. त्यानंच पितरांचे आशीर्वाद घेतले पाहिजेत. तुमचे काय मूल ना बाळ. करू दे त्याला श्राद्ध." नरसींच्या बंधूंना हे पटले, असे सारंगधराला वाटेना. त्यानं बोलणं बदललं. "वहिनी बऱ्या आहेत ना ? खूप दिवसांत तुमचे घराकडे आलो नव्हतो. आज अगदी यायचा विचार होता. माझी बायको परवाच गावाहून आली—वहिनी आणि ती एकाच गावच्या. तेव्हा त्यांच्या माहेरचा थोडा निरोपही होता. "हो का ?" नरसींचे बंधू म्हणाले, "मग चलाना, आत्ताच, मी मागाहून जाईन नरसीकडे. अजून उद्याचा दिवस अवकाश आहे." दोघं बोलत बोलत घरी गेले. गप्पा सप्पा सुरू झाल्या. नरसींचे बंधू जरा परसदारी गेले होते. तेवढ्यात आपले रस्त्यातले बोलणे त्यांनी नरसींच्या भावजयीच्या गळी उतरवले ती प्रथमपासून नरसींचा द्वेष करीत होतीच. तिने सारे गुपचूप मान्य केले. गूळपाणी घेऊन सारंगधरजी घरी गेले.

दुसऱ्या दिवशी नरसींची भावजय—दुरितगौरी—एकाएकी आजारी पडली. तिचे पोट खूप दुखू लागले. तिने नवऱ्याला हाक मारून सांगितले, "उद्या माझे हातून स्वयंपाक होणार नाही, तरी श्राद्ध नरसीकडे होऊ दे." ती पोटदुखीने गडबडा लोळू लागली.

नरसीचे भाऊ अगदी घाबरून गेले "मी नरसीच्या पत्नीला इकडे बोलावू का ?" ती करील स्वयंपाक. दुरितागौरी एकदम संतापली. "का बरं ? नरसीला घर नाही का ? त्यानं एखाद्या अडचणीला बापाचं श्राद्ध केलं तर काय बिघडलं. तुमचे वडील त्याचे कोणी नाहीत का ? जा. आत्ताच्या आता सांगून या. आपण बोलावलेल्या साऱ्या ब्राह्मणांना

त्यांच्या घरी पाठवून द्या म्हणजे झालं !" बायकोपुढे बोलणे नरसींच्या बंधूना कधीच जमले नव्हते. ते खाली मान घालूनच नरसीकडे निघाले. त्यांना खूप वाईट वाटत होते. पण इलाज नव्हता.

बंधू घरी आले तेव्हा नरसीना खूप बरं वाटलं. पतिपत्नीनी त्यांना नमस्कार केला. येण्याचं कारण विचारलं. आपण असे कष्टी का दिसता ? म्हणूनही विचारले. ते खाली मान घालूनच म्हणाले. "नरसी, तुझी वहिनी एकाएकी आजारी पडली. तेव्हा उद्यांचा पित्याचा श्राद्धविधी तुझ्याकडे कर असे सांगायलाच मी आलोय."

" एवढंच ना ? काही हरकत नाही. मी आताच ब्राह्मणांना सांगून येतो." नरसीचे बंधू म्हणाले, "अरे मी साऱ्यांना बोलावणं केलेलंच आहे. ते इकडेच येतील. ब्राह्मण आप्त मंडळी मिळून पंचवीस पान होईल."

" ठीक आहे. जशी आपली आज्ञा ! आपण उभयतांही इकडेच भोजनाला या." नरसी म्हणाले. बंधू घरी गेले. नरसींची पत्नी हे सारं ऐकत होती. ती म्हणाली, " अहो, घरात एवढ्या माणसांची सामुग्री आहे का ? तुम्ही हो म्हणालांत पण मी काय करू !"

नरसींना वाईट वाटले. परमेश्वराला काळजी ! त्याला हवं तसं तो करील. विनाभोजन माझे दारातून ब्राह्मण जातील. ते उदास झाले !

इतक्यात पत्नीनं घरात जाऊन एक बारीकसा अलंकार आणला. आणि तो नरसींच्या हातावर ठेवला. जा, लौकर जा. शिधासामुग्री घेऊन या. नरसींना पत्नीच्या ठिकाणी साक्षात रुक्मिणीमाता दिसू लागली. घरातला दागिना त्यांनी कधीच पाहीला नव्हता.

दागिना घेऊन नरसी बाजारात गेले. दागिना वाण्याला दिला. जेवढी दिली तेवढी सामुग्री घेऊन घरी आले.

श्राद्ध दिवस उजाडला. ब्राह्मण जमले. आप्त जमले. नरसींच्या पत्नीने सर्व स्वयंपाक तयार केला. इतक्यात आठवण झाली. वरण-भातावर वाढायला लोणकढे तूप नाही. लगेच नरसी हातात भांडे घेऊन वाण्याकडे गेले. परंतु वाण्याने तूप द्यायचे नाकारले. ' तो म्हणाला– " नरसी, अहो एवढ्याशा सोन्यात मी किती सामान देणार." नरसी हिरमुसला. एवढ्यात समोरच्या वाण्याने त्यांना हाक मारली. " नरसी, मी देतो तुम्हांला तूप. मला पैसेही नकोत. पण–माझी एक अट आहे." " कसली अट ? " नरसीने विचारले. आपण मला भजन गाऊन दाखवावं." वाहवा ! नरसीची आवडीची गोष्ट. पित्यासाठी भजन ! काही हरकत नाही. त्यांनी आसन ठोकले आणि भजनाला सुरुवात केली.

भजनच ते ! नरसीला कोण थांबवणार. एकामागून एक गाणी सुरू झाली. बारा वाजले, एक वाजला, दोन वाजले. भोवती मंडळीही रंगून उभी होती. घरचं श्राद्ध, ब्राह्मण सारं ते विसरले होते.

इकडे सारी मंडळी पाने मांडून सर्व तयारीसह सिद्ध होती. पण नरसींचाच अजून पत्ता नव्हता.

नरसींचे बंधू प्रसादाला बायकोच्या सांगण्यामुळे गेले नव्हतेच. दुरितागौरीही कोठे तरी बाहेर निघून गेली होती. घाबऱ्या घाबऱ्या एका माणसाने त्यांचे दार ठोठावले. "कोण" म्हणून नरसींच्या बंधूंनी दार उघडलं. "हे पहा," तो माणूस म्हणाला. "सारी माणसं, ब्राह्मण पानावर खोळंबून बसले आहेत, लोणकढं तूप घेऊन आपण यावं अशी ब्रह्मवृंदांची आपल्याला आपल्या पित्यासाठी विनंती आहे. पिंड आपल्या तुपावाचून तयार होत नाहीत." मुळात सरळ स्वभावाचा तो माणूस. बायकोचा राग विसरला. घरांतले तुपाचे भांडे घेऊन रस्त्याने धावतच ते नरसीकडे आले. तिथं आल्यावर त्यांना सारे कळले. नरसी येईपर्यंत मीच श्राद्धविधीला बसतो म्हणून ते पाटावर बसले. सर्व यथासांग झाले. साऱ्यांची भोजने झाली. पण अजून नरसींचा पत्ता नव्हता. आप्त मंडळीही जेवली आणि घरी निघणार तोच समोरून नरसी तुपाचे भांडे घेऊन येताना दिसले. साऱ्यांना आश्चर्य वाटले.

नरसींच्या बंधूंना निरोप कोणी दिला. त्यांनी तूप कसं आणलं. साऱ्यांच्या पुढे प्रश्न उभा राहिला. परंतु भावाला पाहताच नरसीला प्रेमाचं भरतं आलं. 'तू सारं केलंस. छान झालं. तुझाच होता हा मान.' म्हणतच त्यांनी बंधूला वंदन केले. 'पण तुला निरोप कोणी दिला?' 'आला होता एक ब्राह्मण!' एवढे बोलणे होते तो पत्नीने हांक मारली. 'सकाळपासून पोटात काही नाही. जेऊन घ्यावं.' प्रश्न तितकाच राहिला. नरसींचे बंधू म्हणाले, 'नरसी, अरे माझ्या मनाला फार वाईट वाटत होतं. सारखं वाटत होतं आपण जायलाच हवं तोच हा निरोप. मी सारं विसरलो आणि आलो. आता तू जेव. मला

जायलाच हवं. आज पत्नीचं मन मोडायचं धारिष्ट्य मला कसं झालं कोण जाणे ! तुझा परमेश्वर माझं रक्षण करो.' ते तावडतोब घरी गेले.

हे कसं झालं ! नरसींच्या बंधूंचं हृदय–परिवर्तन झालं एवढं खरं ! गावातल्या लोकांना, सारंगधरांना, साऱ्यांना कळलं. वडिलांचं श्राद्ध नरसीने उत्तम केले. ब्राह्मण संतुष्ट झाले. कोण होतं याच्या मुळाशी !

कुणाच्याही रूपानं परमेश्वर याच्यासाठी उभा राहतो हेच खरं ! आता नरसीबद्दलही लोकांचा आदर वाढत होता.

आणि सारंगधर. आपली प्रत्येक युक्ती फसते म्हणून दुःख करीत होता. द्वेषाने जळत होता.

## १३ : : अविश्वासू डोळे

सारंगधराच्या मत्सराने पुन्हा पेट घेतला होता. काही दुष्ट प्रवृत्तींचे लोक जमवून पुन्हा काही विपरीत घडवायचा ते प्रयत्न करीत होते.

सारेजण रानात मारुतीच्या देवळात संध्याकाळी जमणार होते. नरसीलाच नाहीसा करावा. त्याचे घरदार नाहीसे करावे अशी कल्पना त्यांच्या डोक्यात घोळत होती. पण हे कृत्य कसे करावे यावर विचार-विनिमय चालू होता. साधारण अंधार पडला होता. इतक्यात झाडा-वरून एक साप लोंबकळताना सर्वांना दिसला. सारेजण घाबरले. काठी बिठी कोणाजवळ नव्हती म्हणून ते सारे उठून पळत चालले. ते सापाचे धूड नेमकं सारंगधराच्या पायाशी पडलं. आणि त्यांचा त्या

वेटोळ्याला धक्का लागला. सापच तो ! तो कडकडून चावला. पळता पळता ते झीट येऊन पडले. साप निघून गेला. सारेजण मागे वळले आणि सारंगधरांना सावध करू लागले. आता काय करणार ? साऱ्यांना चिंता पडली. आपल्यावर काही बालंट आले तर ! त्यांनी नरसींच्या दारात सारंगधराला नेऊन टाकायचं ठरवलं आणि त्यांनी तसे केलेही. रात्र होती. वर्दळ बंद झालेली. कोण कुणाकडे पाहणार ! ती मित्रमंडळी नरसींचे घरापासून पसार झाली.

नरसी देवदर्शनाहून परतले होते. दारात कुणी तरी पडल्यासारखं त्यांना दिसलं. त्यांनी हात लावला तर ती व्यक्ती बेशुद्ध. घरातून दिवा आणला. आणि ते पाहू लागले. 'कोण, सारंगधर, काय झालं याला ?' ते त्याच्याजवळ बसून राहिले, त्याच्या अंगावरून हात फिरवू लागले 'परमेश्वरा, काय झालं बरं याला ! याला क्षमा कर, आणि वाचव !' त्याने भजन सुरू केलं.

चमत्कार म्हणा की सारंगधराची आयुष्य–दोरी बळकट म्हणा ते हळुहळू शुद्धीवर आले, कण्हू लागले. त्यांनी चहूकडे नजर टाकली. आपण कुठं आहो, आपणाजवळ कोण आहे, याचा त्याला अजून बोध होत नव्हता.

नरसीने घरातून दूध आणले; थोडं घ्या म्हणून त्यांनी सारंगधराला दिलं. 'बरं वाटतंय ना ? घरी पोहोचवू का ?' मधुर आवाजात ते विचारू लागले.

ती मधुरता – ते प्रेम – जवळ नरसी – त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आपल्याला झालं तरी काय ? तो मुकाट्यानं उठून चालू लागला.

जन्मभर जो नरसीवर अपकार करीत होता. त्यालाच नरसीनं उपकार करून वाचवले होते. धन्य तो नरसी की ज्याने शत्रूलाही प्रेमच दिले !

## १४ : : पत्रिका जमली

दिवसा मागून दिवस जात होते. सुखी असा, दुःखी असा, काळ कुणासाठी थांबत नाही. सूर्य-चंद्राचं भ्रमण अव्याहत चालू होतं. अगदी तसंच नरसींचं भजन–पूजन चालू होते. लोकांच्या मनात नरसींबद्दल आदर मात्र वाढत होता. संसारी संत म्हणून नाक मोडणारे पण कुणी होतेच.

मुलीचं लग्न झालंच होतं. आता मुलगाही लग्नायोग्य झाला होता. सुस्वभावी, सदवर्तनी आणि जाईबापांना मानणारा मुलगा. थोडाफार व्यापारही करीत होता. लग्न आणि घरच्या गोष्टी यात नरसींना काहीच वाटत नव्हतं. मग पुढाकार घेऊन कोण बघणार ? पण ज्याची काळजी घ्यायला परमेश्वर येऊन उभा राहतो – त्याला काय कमी ! त्यांचं सारं नीट होणारच

दुष्ट माणसांचा दुष्टावा चालूच होता. नरसी ढोंगी आहे. आज ना उद्या त्याचं ढोंग नक्कीच बाहेर काढता येईल असेही काहींना वाटायचं.

दूरच्या एका राज्यातून गावातल्या श्रेष्ठींकडे पाहुणे आले होते, राजकन्येसाठी वर शोधावा असा त्यांचा हेतु होता. पाहुण्यांनी गावात

कोणी लग्नाचे चांगले मुलगे आहेत का असा प्रश्न विचारला. चौकशी करायचे ठरले. सारंगधरजींचा मित्र म्हणजे सारंगधरजीसारखाच. त्यांनी पाहुण्यांना फराळाचे आमंत्रण केले. पाहुणे घरी आल्यावर – नरसीचा मुलगा लग्नाचा आहे असे सुचविले. गुप्त सावकारी करतो, आपण पहावा. योगायोगाने नरसींचा मुलगा रस्यातून जात होता. पाहुण्यांना पहायला मिळाला. मुलगा पाहून त्यांना फारच आनंद वाटला. ते तसेच नरसींच्या घरी गेले. आतिथ्यशील नरसीने प्रेमाने ‘ कोण’, ‘ कुठले ’ चौकशी केली. येण्याचा हेतू विचारला. पाहुण्यांनी मोकळेपणी सारे सांगितले व मुलाची पत्रिका मागितली. ज्योतिषी बरोबर होतेच. पत्रिका पाहून त्यांना फारच आनंद झाला. मुलगा भाग्याचा असून सुशील आहे तेव्हा राजकन्येसाठी वर निश्चित करायला काही हरकत नाही, असे त्यांना वाटले. मुलगा त्यांच्या मनात भरला. नरसींना त्यांनी बोलूनही दाखविले. नरसीजी म्हणाले, ‘ आपण काय बोलता आहा, खरोखरी मला समजत नाही. मी गरीब माणूस. पैसा नाही, अडका नाही. ही सोयरीक योग्य नव्हे. आपण दुसरा एखादा मुलगा पाहावा ! ’ पाहुण्यांनी त्यांचे बोलणे मानले नाही.

‘ आपल्याला पैशाची काय गरज ! महाराजांना काही कमी नाही. काय एवढे बोलून टिळा लावण्याच्या तयारीसाठी ते उठले. लोकांना कुणकूण लागली. परंतु ठरत असलेलं लग्न मोडणं पाप आहे या समजुतीनं कोणीच काही बोलले नाही. मुलाच्या हाती नारळ-रुपाया दिला आणि ते परतले. नरसींचा मुलगा राजाचा जावई होणार ! काय हास्यास्पद आहे हे ! नरसी कसा कबूल झाला ? शेवटी हा ढोंगी लोभाला बळी पडला. एक ना दोन तऱ्हेतऱ्हेच्या गाववार्ता पसरत होत्या कोणी भाग्य म्हणत तर कोणी मूर्खपणा म्हणत.

‘ देवानं काय बला आणली ही, ’ एवढेच नरसी म्हणत.

पाहुणे राज्यात परत आले व मुलीचा वर निश्चित झाला असे महाराजांना सांगितलं. पाठोपाठच त्यांना काही गुप्त खलिते आले. एका दरिद्र्याच्या घरात मुलगी पडत आहे; सावध असावे. राजाला आश्चर्य वाटले. हेरांकडून शोध केला. मुलगा चांगला आहे परंतु दारिद्र्य खरे आहे, एवढे त्याला कळले. राजाला राग आला. त्याने प्रधानाला हे लग्न मोडण्याबद्दल सांगितले. परंतु प्रधान कबूल होईना. आपला शब्द बदलणे योग्य नव्हे असा सल्ला त्यांनी दिला. मुला-मुलीची पत्रिका उत्तम जमते आहे. आपण काळजी करू नये.

'ठीक आहे.' राजा म्हणाला. आता दोन्ही बाजूंचा खर्च आपल्याला साजेसा आपणच करावा असे ठरले. गावाबाहेर प्रतिगाव उभे करून वरपक्षाला उतरून घ्यावे. त्याप्रमाणे सगळीकडे हुकूमही सुटले, लग्नाची तयारी सुरू झाली.

जुनागडची हालचाल काय होती. गावकरी एकत्र जमले होते. आणि नरसींच्या मुलाच्या लग्नाला सर्व गाव जायचं असं ठरवत होते. कोणीतरी म्हणालं, 'नरसीनं बोलावलं नाही तर? त्याला तोंड आहे का बोलवायला? काही विकायला तरी जवळ आहे का त्याच्याजवळ? आता तेच तर जाऊन बघायचं. मागं ठेवलेली पुंजी काढतोय का काय ते!' कुणी टवाळ म्हणाला, 'हीच महत्त्वाची वेळ आहे. जरी बोलावलं नाही तरी सर्वांनी लग्नाला जायचं.'

प्रत्यक्ष नरसीच्या घरी काहीच हालचाल नव्हती. ज्यानं ठरवलं तो करील सारं, एवढेच ते म्हणत.

# अगांतुक पाहुणे

सकाळची वेळ होती. नरसीच्या दारात एक सामानाने गच्च भरलेली गाडी उभी राहिली. आणि तीतून एक जोडपं उतरलं. नरसी इथेच राहतो ना? कुणाचा आवाज! नरसींची पत्नी बाहेर येऊन पाहू लागली. 'मुली, पाहतेस काय अशी? चुलता आहे मी नरसीचा. तुझ्या मुलाचं लग्न राजाच्या मुलीशी ठरलंय ना? आम्हाला कळलं म्हणून धावतच आलो.' नरसीच्या पत्नीनं पुढे होऊन नमस्कार केला. त्यांना घरात नेलं. ओळख कुणालाच पटेना. चुलता बोलू लागला, 'अरे नरसी, तुमच्या दारिद्र्यामुळे आम्ही तू बाळ असल्यापासूनच तुमच्यापाशी कधी जवळ झालो नाही. आम्हांला लाज वाटली तुमची. पण आता ऐकलं की, राजाची मुलगी सून होतेय तुझी.' 'आहे तरी काय? काकाजी, मी पूर्वीसारखाच गरीब आहे अजून. पण हे कसं घडत आहे मलाच कळत नाही.' नरसी नम्रपणे बोलला.

'अरे, जाऊ दे! आता चिंता करू नको. मला तरी पुत्र कुठे आहे. माझं सारं तुझंच आहे. आता सूनबाई जोरात तयारीला लागा बरं'–काकाजी म्हणाले. दूध फराळ झाला. काकीही घरात मिसळून गेल्या. नरसींच्या बायकोला चिंता पडली. यांचे पैसे मिळतील तेव्हा मिळतील, पण आज या श्रीमंत माणसांची उठबस आपल्याला कशी झेपणार?

चुटकीसरसा प्रश्न संपला.–काकाजी मोहरा घेऊन बाजार करीत सुटले.–धान्यधुन्य, कपडालत्ता–सारं घरी येऊन पडलं. मुलीचे दागिने घडायला गेले... यक्षिणीची कांडी फिरावी तसं सारं सुरळीत सुरू झालं.

सासू-सुना गावात निमंत्रण करीत फिरू लागल्या. गावातल्या लोकांना वाटे – कधी न देखलेला हा चुलता आताच कुठून उपटला ? देवाची करणीच म्हणायची ही. नरसी भाग्याचा खरा ! कोणी नरसीच्या पत्नीला तोंडावर विचारीत, ' या कोण ? ' ती माउली सरळपणे सांगे, ' सासूबाई आहेत.'

लग्नाचा दिवस जवळ आला. काका-काकी रात्रंदिवस राबत होते. उभ्या गावाला निमंत्रण दिले. काका-काकींनी पुढं जायचं ठरवलं.

राजाच्या गावाजवळ तंबू पडले–राहुट्या लागल्या. नोकर-चाकर हिंडू लागले.–मुदपाकखाना सुरू झाला. पक्वान्नांच्या राशी तयार होऊन पडल्या. पताका-तोरणे लागली.

नगराबाहेर कोण पाहुणे उतरलेत ? जासूद शोध घेऊ लागले. महाराजांची परवानगीही न काढता कोण दांडगाईने येऊन राहिले आहेत ? चौकशा सुरू झाल्या.

अधिकारी विचारायला गेले. काकाजी समोर होतेच. त्यांनी सांगून टाकलं, ' आम्ही नरसी महाराजांचीच माणसं आहोत. तयारी करण्यासाठी पुढं आलो आहोत–महाराज परवा सकाळीच येतील.' अधिकारी परतले.

अंमलदार, जासूद सगळेच दिपून गेले. नरसी महाराज दरिद्री आहेत हे खरं नाही तर ! त्यांनी राजाला वर्दी दिली. आणि सारी हकीकत सांगितली. महाराजांनाही नवल वाटले.

सर्व लवाजम्यानिशी परवा नरसी महाराजांना सामोरं जायला हवं. प्रधानजींचा हुकूम सुटला. नगर सुशोभीत केले–मंडप उभारले–तोरणें लागलीं. महाराजांच्या चर्येवर आनंदही दिसू लागला.

एका सुंदर गाडीतून नरसी आले. ते सारं पहात होते. हे उसनं वैभव त्यांना सुखवीत नव्हतं. तरी ते शान्त होते, त्यांच्यासाठी खास उभारलेल्या एका छोट्या राहुटीत ते गेले. मुलीचे वडील, नगराचे महाराज भेटायला येत आहेत. जासूदांनी निरोप आणला. लगेच दोघे-चौघे उत्तम पोशाख करून महाराजांना सामोरे गेले. ‘ कुठे आहेत नरसी महाराज ? ’ राजाने प्रश्न विचारला. ‘ आपल्याला जरा थांबावं लागेल.’ एका भव्य तंबूत राजाला बसविण्यात आले. त्या तंबूत उत्तम पोषाखाचा एक सरदार थांबला होता. राजाला प्रथम हेच नरसी असे वाटले. त्यांनी लवून अभिवादन केलं. तितक्याच विनयानं तो सरदार म्हणाला, ‘ नरसी पलीकडे आहेत. ’ राजा शरमिंदा झाला. हे नातेवाईक जर इतके श्रीमंत आणि उमदे—तर—नरसीजी कसे असतील ? शुभ्र कपड्याचा एक माणूस राजाला नेण्यासाठी आला. अगदी साध्या तंबूत नरसी बसले होते. त्यांनी उठून राजाला नमस्कार केला. राजाचा कंठ गहिंवरून आला. ‘ मी आपली चौकशी प्रथम केली नाही. तरी आपण मला क्षमा करावी.’ राजा म्हणाला.

‘ क्षमा करणारा द्वारकाधीश आहे. मी कोण ? हा देह, हे सारं त्याचंच आहे, ’ नरसीजी म्हणाले.

‘ माझ्या मुलीचं भाग्य थोर हेच खरं ! ’ मंडळी परतली. लग्नाचा दिवस आला. गावकऱ्यांच्या गाड्या भरभरून येत होत्या. साऱ्यांची चौकशी होत होती. पाच पक्वान्नांची जेवणं सुरू होती. योग्यतेनुरूप वस्त्रे-अलंकार दिले जात होते. मंगल वाद्ये वाजत होती. मिरवणुकीची तयारी झाली. हत्ती-घोडे पायदळ सारे व्यवस्थित उभे होते. आनंद सोहळा सुरू होता.

लग्नाचा असला सोहळा गावकऱ्यांनी पूर्वी पाहिला नव्हता. साऱ्यांची मती कुंठित झाली होती.

समारंभ उरकला. लोक घरोघर परतू लागले. पत्नीसह नरसीही निघाले. पण काका-काकी कुठं सापडत नव्हते. पुढं तर गेले नसतील ! सारं वैभव तिथंच ठेऊन काका-काकी गावी गेले होते.

आम्हांला जाताना भेटलेही नाहीत. नरसीला आणि त्यांच्या पत्नीला वाईट वाटत होते.

गावालाही आश्चर्य वाटत होते. सारं कौतुक बघायचं सोडून हे जोडपं निघून का गेलं ?

आता नरसींच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू प्रवाह सुरू होता. भक्ताचं कार्य करण्यासाठी देवा तूच आला असला पाहिजे. मला भेटला नाहीस. किती हतभागी मी ! – माझ्या प्रपंचकार्यासाठी तुला शीण दिला. त्यांना अपार दुःख झालं. देवा तुला शोधण्यासाठी मीही आता तुझ्यामागे येतो. नरसी निघाले.

आता गावकऱ्यांचेही डोळे उघडले. त्यांना नरसीची योग्यता कळली. त्यांची निस्पृहता पटली.

त्यांनी एकमुखाने नरसींचा जयघोष केला.

धन्य तो देव आणि धन्य तो भक्त ! भजनामृत पिऊन चिरंजीव झालेला हा भक्त नरसी मेहता आजही काव्यातून शिकवण ठेऊन गेला आहे.

“ वैष्णव जन तो तेने कहिये पीड पराई जाणेरे ”

BVBK-0401262

९२६२ दि० २०।५।६९
चि० बा० वा.